# Mukt Shabd

## UGC CARE JOURNAL

ISSN NO : 2347-3150

MUKt SHABd JOURNAL

UGC
University Grants Commission
Approved Journal List

Impact Factor : 4.6

A Peer Reviewed/ Referred Journal

Edited By
MSJ : Mukt Shabd Journal
http://shabdbooks.com/

Copyrights @ 2020 MSJ. All Rights reseved.

Scanned with OKEN Scanner

31) 150 वर्षात महात्मा गांधीच्या विचाराची प्रस्तृतता - *डॉ. संगमेश्वर निला* 85
32) महात्मा गांधी विचारांची उपयोगिता आणि धर्मासंबंधी विचार - *संजय सदाशिव जाधव* 88
33) महात्मा गांधी व पंचायतराज - *प्रा. संजय अंकुशराव जगताप* 91
34) गांधीवादी विचार आणि मिरला कथासंग्रह - *प्रा.डॉ.संजय शांताराम पाटील* 93
35) महात्मा गांधीची सत्याग्रह संकल्पना - *डॉ. संजय दगडू क्षीरसागर* 98
36) राष्ट्रपिता महात्मा गांधीचे जीवनविषयक तत्वज्ञान - *डॉ. सत्यभामा जाधव* 102
37) गांधीजीच्या दृष्टीने स्त्रीयांची सामाजिक स्थिती - *सीमा बाबुराव उप्पलवार* 104
38) वैश्विक शांततेसाठी गांधी विचार - *प्रा.डॉ.ए.टी.शिंदे, अंबिका गोविंदराव चोंडे* 106
39) गांधीजींची नयी तालीम : ग्रामोद्योगांद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा एक अभ्यास - *प्रा.डॉ. शिवाजी परळे* 108
40) महात्मा गांधीजीच्या विचारांची प्रासंगिकता - *प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड* 112
41) हिन्दस्वराज्य : सामाजिक मुल्ये - *प्रा. तेलंगे एन. एन.* 116
42) महात्मा गांधी यांचे ग्रामीण विकासासंबंधीचे विचार - *प्रा. डॉ. चंद्रशेखर ठाकरे* 118
43) महात्मा गांधी यांची ग्रंथसंपदा मराठीः वाचकांसाठी अनमोल ठेवा - *तुकाराम सिताराम गरड* 121
44) महात्मा गांधींची सत्याग्रह संकल्पनेची उपयोगिता - *डॉ. तांदळे सच्चिदानंद काशिनाथ* 127
45) महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास - *प्रा.डॉ.मानवते उत्तम हुसनाजी* 129
46) महात्मा गांधीजी यांचे राजकीय कार्य आणि त्यांचा सद्यकालीन राजकारणावर असणारा प्रभाव - *प्रा.डॉ.आचार्य व्ही.डी.* 131
47) महात्मा गांधींजीचे नागरी समाज विषयक विचार - *डॉ. वितेश भारत निकते* 134
48) महात्मा गांधीजींची लोकशाही - *प्रा. डॉ. विठ्ठल पंडितराव सांडूर* 136
49) गांधीवादातील अहिंसा : एक विवेचन - *डॉ.बी.आर.भोसले* 138
50) १५० वर्षानंतरचे महात्मा गांधी - एक अभ्यास - *डॉ. दीपक द. कोटुरवार* 140
51) 'मिठाचा सत्याग्रह' सविनय कायदेभंगाची प्रेरक शक्ती - *डॉ. शिंदे आर. डी.* 142
52) महात्मा गांधी प्रणित ग्रामीण विकास - *डॉ.नामानंद गौतम साठे* 145
53) वर्तमानकाळातही महात्मा गांधीजींचे सत्याग्रह : एक प्रभावी शस्त्र - *प्रा.पी.व्ही.माने* 148
54) महात्मा गांधी यांचे सत्यागृहाबाबतचे विचार - *डॉ. सुभाष के. पवार* 151
55) महात्मा गांधींजींच्या नेतृत्वाची जडण-घडण - *विरभद्र गुरप्पा स्वामी* 154
56) गांधी विचारांची सदयकालीन उपयुक्तता - *डॉ.विश्वनाथ महादेव आवड* 157
57) महात्मा गांधीचे शाश्वत विचार - *डॉ. माधव कदम* 160
58) "महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता" - *प्रा.स्वामी प्रविण वसंतराव* 162
59) गांधीजींचे स्त्री सक्षमीकरणात योगदान - *डॉ. हट्टेकर विजय दत्तात्रय* 164
60) महात्मा गांधी विचार समज गैरसमज - *प्रा. सकरगे एन. व्ही.* 169
61) 150 वर्षानंतर आर्थिक विकासात गांधी विचाराची गरज. - *श्री. होगे आर. ए.* 172
62) शासन व्यवस्थेत सत्याग्रहाची भूमिका - *प्रा.डॉ.कुंभारकर के.जी.* 176

Scanned with OKEN Scanner

ISSN NO : 2347-315

# महात्मा गांधी प्रणित ग्रामीण विकास

*डॉ.नामानंद गौतम साठे*

*राज्यशास्त्र विभागप्रमुख,*

*शि.म.ज्ञानदेव मोहेकर कॉलेज कळंब जि. उस्मानाबाद.*

**प्रस्तावना :-**

ग्रामीण विकासात शेती व्यवसाय, पशुपालन, कुटीर उद्योग, ग्रामीण शिक्षण, ग्रामपंचायत इ विषयावर गांधींनी विचार मांडले गांधीच्या ग्रामीण विकासात भारतातील खेड्याचा उध्दार करणे सर्वांगिण विकास घडवून आणणे या मुलभूत हेतूसाठी गांधींनी प्रयत्न केले खेडी स्वंयपुर्ण झाली पाहिजेत त्यांनी १८ मुद्यांचा एक कार्यक्रम आखला खेड्यातील उदयोगधंदयाची वाढ, मुलभूत व प्रौढ शिक्षण, आरोग्य, मागास वर्गांचा विकास, स्त्रीयांचा उध्दार, राष्ट्रीय भाषांची वाढ, कामगार व किसान व विदयार्थी यांच्या संघटन अशा बाबींचा समावेश होता. त्यांच्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी आखिल भारतीय ग्रामउदयोग मंडळ, आखिल भारतीय विणकर मंडळ,खादी विदयालय सेवा ग्राम, कालुपाटी येथे गांधी निकेतन त्रिपुर येथे कस्तुरबा आश्रम इ. संस्था अस्तित्वात आल्या हरिजन सेवक संघ हिंदुस्थानी प्रचार संघ सर्वोदय भदान चळवळ इ. संघटना माहात्मा गांधीच्या कल्पनेतुन झाल्या. महात्मा गांधींनी स्वतंत्र भारतामधील गावांचे पुनर्निर्माण संकल्पना स्पष्ट करुन त्याला ग्रामस्वराज्य असे नांव दिले गावला विकासाचे एकक मानून ग्रामविकास व्यवस्थेचा विचार मांडला स्वावलंबन हा गावाचा आधार ठरविला गांधीच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेला स्वतंत्र भारतामध्ये ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आधुनिक रुप देण्यात आहे. गांधीवादी विचारानुसार भारतीय संविधानामध्ये कलम ४०,४३,४७, ४८ इ. कलम समाविष्ट केलेली आहेत.

आजच्या जागतिक परिस्थितीत पुन्हा नव्याने गांधी विचाराच्या परिशीलनातून आर्थिक विकास, संपूर्ण रोजगार, आर्थिक व सामाजिक समता, सामाजिक न्याय, राजकीय लोकशाही, व्यक्तिगत स्वातंत्र, याबाबतचा अशावाद जागृत होऊन सामाजिक न्यायाच्या दिशेने पुढे मार्गदर्शन करण्याचा विचार व्यक्त होत आहे.

**संशोधनाचा उदेश्य :-**

सदर शोध निबंध खालील उदेश्य समोर ठेवून करण्यात आलेला आहे.

१) ग्राम विकासाची संकल्पना स्पष्ट करणे.

२) ग्रामविकासाचा बदलत्या.विचारावर प्रकाश टाकणे.

३) गांधीजींचे ग्रामीण समुदायाविषयीचे विचार अभ्यासणे.

४) ग्रामीण विकासासाठी गांधींनी सुचवलेल्या उपययोजनांचा आढावा घेणे.

**महात्मागंधीचे ग्रामीण विकास विषयक विचार**

**१) ग्रामोद्योग व कुटिरउद्योगांचे समर्थन :-**

ग्रामीण उद्योगधंदयामुळे हजो लोकांना रोजगाराच्या संधी स्थानिक पातळीवर उपलब्ध होतात ग्रामीण जनतेच्या कौशल्याचा वापर स्वविकासासाठी करुन घेण्याची संधी उपलब्ध होते.ग्रामीण उद्योगधंदयाव्दारें उत्पादित माल मोठ्या प्रमाणावर सहकारी तत्वावर विक्री करता येतो, ज्याव्दारे ग्रामीण जीवन सुरळीतपणे चालु शकते. गांधीनी भारतातील दारिद्रयाचा अभ्यास करुन देशात लहान - लहान ग्रामोद्योग कुटीरउद्योग सुरु करावेत असे विचार मांडले

**२) ग्रामविकास :-** खेड्यात राहणाऱ्या शेती व्यवसाय करणाऱ्यांनी उत्पादीत केलेले अन्नधान्य फळ भाज्या औषधी वनस्पती यावरच मानवी जीवन चालते, म्हणून ग्रामीण विकास होणे आवश्यक आहे. महात्मा गांधीजींच्या मते स्वतंत्र भारताचे राष्ट्रीय नियोजन हे ग्रामीण घटकाला प्राधान्य देणारे असावे. खेडे गावातील लोकांच्या स्वयंप्रेरणेला व कर्तृत्वाला संधी मिळेल आपला दैनंदिन कारभारी स्वत:च पंचायत पध्दतीने स्वावलंबन आणि स्वंयपूर्ण ध्येयाने आदर्श ग्राम समाजरचना स्वीकारावी.



Scanned with OKEN Scanner

**३) ग्रामपंचायतीची निर्मीती :-** ग्रामपंचायती म्हणजे खेड्यातील पंचमंडळीकडून कारभार पाहण्याचे मंडळ लोकशाही धोरण ठरविण व्यक्तीस्वातंत्र महत्वाचे असते. खेड्याचे सत्ता खेड्यात रहावी आणि ती लोकांच्या विकासासाठी वापरली जावी यासाठी नियोजन करणे घरगुती व आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला देणे आवश्यक आहे. गावाच्या विकासाठी कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देणे व खेडी स्वंयपूर्ण बनवणे हा त्याचा उद्देश होता.

**४) मुलभूत शिक्षण :-** व्यक्तीचे शरीर, मन आणि आत्म्याच्या सर्वांगीण विकास साधते ते शिक्षण महात्मा गांधीच्या मुलभूत शिक्षण संकल्पनाचा पाया आहे. शिक्षण सातत्यपूर्ण चालणारी प्रक्रिया आहे. साक्षरता म्हणून शिक्षण नव्हे सुतार काम, चप्पल बनवणे,बागकाम करणे इं. शिक्षण दिले पाहिजे. प्रेरणा केवळ पुस्तकी ज्ञानातून मिळत नाही शिक्षकांचे जीवनचरित्र याव्दारे विद्यार्थ्यांचे नैतिक जीवन घडत असते.

मुलभूत शिक्षण पध्दतीव्दारे ग्रामीण भागामध्ये शांततेने सामाजिक आर्थिक व राजकीय परिवर्तन घडून येईल. बेरोजगारी नष्ट होऊन ग्रामीण जनतेला सामाजिक व आर्थिक सुरक्षितता प्राप्त होऊन श्रमाचा आदर व सदभावना साध्य करता येईल. या शिक्षण पध्दतीव्दारे विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, आत्मसन्मान नैतिक मुल्ये,साजिक जाणीव मोठी जाबाबदारीची भावना वाढीस लागेल. राजकीय व्यवस्थेचा नवा अर्थ व उदेश्य प्राप्त करुन देतील.

**५) ग्रामस्वच्छता :-** पंचायतीने आपल्या गावातील स्वच्छता कशी राहील यामुळे जातीने लक्ष दिले पाहिजे रोगनिवारणासाठी खबरदारी घ्यावी निसर्गोपचारावर भर द्यावा, शरीर, घर, गल्ली व गाव अशी स्वच्छता मोहिम राबवावी ग्रामसफाईत प्रत्येकाने सहभाग घ्यावा गावातील विहीर, नाले स्वच्छ करणे स्वच्छ पाणी पुरवठा करणे सांडपाण्याची व्यवस्था करणे.

**६) स्वदेशीचा वापर :-** महात्मा गांधीनी स्वदेशी वस्तुचा वापर यामध्ये विशेषत : खादी वापरावर मोठ्या प्रमाणावर भर दिला आहे. चरखा हा ग्रामीण विकासाचा प्रतिक आहे त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने चरखा चालवणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपल्याला लागणार तेवढे कापड स्वत: तयार करावे शाळेतून सुतकताई शिक्षण दिले जावे त्यातून त्यांचे दारिद्र दूर होईल व देश संपन्न होईल.

**७) आर्थीक समता :-** गांधी प्रणित आर्थीक समतेचा मुख्य भर हा सर्वांना समान वेतन यावर आहे. प्रत्येक व्यक्तीला पुरेसे व पौष्टिक अन्न योग्य निवारा,पुरेशा प्रमाणात वस्त्र आणि वेळोवेळी आरोग्य सुविधा व प्रशिक्षण साठीच्या अत्यावश्यक सोयी सुविधांची उपलब्धता म्हणजे आर्थीक समता होय श्रम आणि भांडवल यामधील संघर्ष कमी करुन त्यांना एक विशिष्ट पातळीवर आणणे आवश्यक आहे आर्थीक समता म्हणजे प्रत्येकाकडे एकसारखी संपत्ती असणे असे नसून प्रत्येकाकडे स्वत:च्या गरजापूर्ण करण्या इतपत संपत्ती असणे असा होय. अशा प्रकारची आर्थीक समता समाजामध्ये प्रस्थापित करण्यासाठी महात्मा गांधीजींनी विश्वस्त संकल्पना विकासीत केली या संकल्पनेनुसार व्यक्तीने आपल्या मुलभूत गरजा पुर्ण झाल्यानंतर उर्वरित संपत्ती ही इतरांसाठी वापरावी ज्याकडे अशी अतिरिक्त संपत्ती असेल त्यांनी समाजाचे विश्वस्त म्हणून आपली भूमिका पार पाडावी

**८) ग्रामसुधार :-** महात्मा गांधीनी ग्रामसुधार ही योजना मजबुत असली पाहिजे यामध्ये गावातील लोकसंख्या जास्त असेल गावांना स्वालंबनाच्या अनुषंगाने संघटित केल्यास ते खुप काही करु शकतात ज्यामुळे गावातील विकास पूर्णपणे होईल तेव्हा स्त्री पुरुष यांच्यात अंतर राहणार नाही म्हणजेच गावातील लोक सुखी संपन्न राहतील आज जी खेडी ओस पडली आहेत ती पडणार नाही.

**९) शेतीवर आधारीत अर्थव्यवस्था :-** भारत हा कृषी प्रधान देश असल्याने शेती उत्पादीत कच्च्या मालावर आधारीत उद्योग निर्माण केले पाहिजे कच्च्या माल उत्पन्न क्षेत्रात उद्योगास परवानगी द्यावी जेणे करुन ग्रामीण भागात बेकारीची समस्या सुटेल दळण वळणाचा आणि मजुरीचा खर्च कमी झाल्यामुळे उत्पादीत वस्तूच्या किमंती कमी राहतील श्रमाला प्रतिष्ठा मिळेल असे त्यांचे मत होते.

**१०) कृषी विकास :-** भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रमुख क्षेत्र कृषी क्षेत्र होय ग्रामीण भागात राहणाऱ्या जनतेच्या उपजीविकेचे शेती हे साधन आहे. त्यासाठी शेती विकासाला महत्व देण्याची आवश्यकता आहे कृषी बरोबरच कृषी पुरक व्यवसाय आहे उदा. पशुपालन. कातडी उद्योग, तेलगिरण्या व इतर उद्योगाच्या विकासावर भर दिल यास ग्रामीण विकासाला चालना मिळेल असे गांधीचे मत होते. ५ आक्टोबर १९४५ रोजी जवाहरलाल नेहरुंना लिहलेल्या पत्रातील ग्रामविकासासाठी त्यांच्या विचारावरुन त्यांच्या कार्याचा आपणांस बोध होतो ते म्हणतात आज आपले जे ग्रामीण जीवन आहे तेच मी डोळयासमोर ठेवले आहे अशी कल्पना करु नका.माझ्या आदर्श



Scanned with OKEN Scanner

प्रमाणे खेड्यामध्ये बुध्दीमान माणसे असतील आणि ती पशुप्रमाणे घाणीत व अंधारात राहणार नाहीत. पुरुष व स्त्रिया स्वतंत्र असतील आणि जगातील कोणत्याही माणसाशी टक्कर देण्यास समर्थ असतील, कोणी आळशी असणार नाही व कोणी ऐश्वर्यात लोळणार नाही प्रत्येकाला शरीरश्रमाचा वाटा द्यावा लागेल रेल्वे,पोस्ट, तारायंत्रे इ.ना तेथे स्थान असेल कारण माझ्या दृष्टीने खरी वस्तु हाती येणे हे महत्वाचे आहे. मग बाकीच्या गोष्टी आपोआपच येतील मी जर सारे गमावून बसलो तर बाकी सारे नष्ट होईल

गांधी प्रणित ग्रामस्वराज्यावर आधारित लोकशाही मात्र लोककर्तृत्वाची कास धरते. लोकांची उपक्रमशीलता, क्रियाप्रवणता आणि निर्णय क्षमता यांना वाव देणारी ग्रामीण प्रजासताची व्यवस्था हीच खरी लोकशाही असते. लोकांचा सहभाग हा लोकशाहीची निर्णायक कसोटी असतो हे गांधीवाद मानतो.

## निष्कर्ष :-

गांधीजीनी आपले आयुष्य सत्याचा शोधासाठी अर्पण केले होते. त्यांचे आत्मचरित्र सत्याचे प्रयोग या नावाखाली प्रसिध्द आहे. गांधीजीच्या सर्व विचारांवरुन खादी व कुटीर उद्योगांना प्राधान्य, अन्नधान्याच्या बाबतीत खेडे स्वयंपुर्ण झाली पाहिजे, श्रीमंत व गरीब यांच्यातील आर्थीक विष्मता कमी झाली पाहिजे, खेड्यातील मुलांना शिकण्याची संधी उपलब्ध झाली पाहिजे,आरोग्याच्या सोयी उपलब्ध झाल्या पाहिजे, ग्रामीण जीवनातुन स्वावंलबनातुन त्यांच्या गरजाची पुर्तता झाली पाहिजे, कृषी विकास झाला पाहिजे. गांधीजीच्या स्वराज्य संकल्पनेतुन भारतात ग्रम पंचायत आमलात आणले गेले. महात्मा गांधीजीचे हिंद स्वराज्य हे पुस्तक म्हणजे ग्रामीण विकासाचा एक प्रकारचा आराखडाच आहे. या पुस्तकातील खेड्याकडे चला संदेश असेल किवा स्वत:चे शासनाची कल्पना असेल वा आत्मनिर्भर व समृध्द खेड्याचे चित्र या सर्व बाबी ग्रामीण विकासाला हातभार लावणाऱ्या आहेत. महात्मा गांधी १९४१ साली सेवाग्राम ते बारडोली या रेल्वेप्रवासत रचनात्मक कार्यक्रम हे घोट पंचविस पाणी पुस्तक लिहिले.१९४५ ला त्यांचे पुर्नलेखन केले आणि देशासमोर १८ कलमी रचनात्मक कार्यक्रम मांडला या कार्यक्रमाचे अध्यायन केले तर सहज लक्षात येते की ग्रामविकासाची त्यांची कल्पना सर्वांगिण स्वरुपाची होती. त्यात त्यांनी जातीय ऐक्य रहावे याला प्राधान्य दिले खेड्याच्या प्रगती शिवाय राष्ट्राची प्रगती होत नाही. वाढती लोकसंख्या व भष्ट्राचार व शासनाची उदासीन धोरणे यामुळे गांधी प्रणित विकासाला खिळ बसली आहे. दारिद्र बेरोजगारावर आजही कुटीर उद्योग ग्रामउद्योगाची प्रासंगिकता मात्र महत्वाची वाटते.

आजची पंचायतराज व्यवस्था संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, तंटामुक्त ग्रामयोजना हागणदारीमुक्त गाव योजना ह्या संथ गतीने कार्य करीत असल्या तरी या योजनेची परिणामकारकता दिसते. कृषी उत्पन्नावर आधारीत लघु,कुटीर उद्योगांना ग्रामीण भागात प्राधान्य देऊन ग्रामीण भागाचे अर्थकारण सुधारुन भारताचा विकास साधता येईल. औद्योगिकरण यांत्रिकीकरणाच्या परिणामी जागतिक मंदी निर्माण झाली आहे या पार्श्वभूमीवर आर्थिक विषमता उपभोगवाद शोषण इ. समस्याच्या सोडवणुकीसाठी गांधीचे विचार उपयुक्त ठरतात.

## संदर्भ


१. पाटील एस.एच. गांधी अॅन्ड स्वराज्य,नवी दिल्ली. दिप अॅन्ड पब्लिकेशन, १९८३ पेज नं.८३.
२. गांधी एम.के. Socilization of my Opinion अहमदबाद भारतीय विद्या भवन १९६६ मुद्रित पृष्ठ क्र.२७८१ महाराष्ट्र राष्ट्रभाषा संस्था, पुणे.
३. गांधी जीवन दिपिका प्रकाशन न.ना. सचिन महाराष्ट्र राष्ट्र भाषा सभा ३८७ नारायणपेठ पुणे. पृष्ठ. ३०.
४. गांधीजीचे आत्मचरित्र - धनजंय किर
५. सत्याचे प्रयोग माहात्मा गांधी
६. माहात्मा गांधी आणि ग्रामीण विकास डॉ. प्रतिभा पाटील व डॉ. अजय पाटील डॉ. आंबादास आरगडे


■■■■■

Scanned with OKEN Scanner